अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. 2

मी शपथेवर कथन करतो की,

माझे नाव : संजय रामकृष्ण मडके,

वय : 57 वर्षे,

कामधंदा : सहशिक्षक

पत्ता : महाराणाप्रताप हौसिंग सोसायटी सिडको एन 7, प्लॉट नं 10, औरंगाबाद.

**<u>अर्जदार यांचा साक्षीदार क्र. 2 चा सरतपास : अर्जदारातर्फे श्री. राहुल जोशी वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरू :</u>**

1. मी अर्जदार यांना ओळखतो, अर्जदार हे शाळेमध्ये वॉचमन म्हणून काम करीत होते. मला आता दाखविलेले **निशाणी यु–16** वरील पत्र महाराणा लेबर कॉन्ट्रॅक्टर यांच्याकडून अर्जदार यांना नेमणुकीसाठी दिलेले होते. मला आता दाखविलेले **नि.यु–17** वरील पत्र महानगरपालिका प्राथमिक शाळा सिक्युरिटी ऑफिस यांनी दिलेले आहे. मला आता दाखविलेले **नि.यु–19 (एकत्रितपणे)** हजेरीपत्रक ऑक्टोबर 2017 ते जुलै 2019 पर्यंतचे प्रमाणितप्रती दाखल केलेले आहे त्यावर माझी मुख्याध्यापक म्हणून सही व शिक्का आहे. सदर हजेरीपत्रकातील मजकुर खरा व बरोबर आहे.

सरतपास : संपला

उलटतपासाकरिता तहकुब.

**श्रवणोत्तर स्विकृत,**

Digitally signed by DATTATRAY SHANKARRAO KHEDEKAR
Date: 2026.02.23 12:35:44 +0530

**(द.शं.खेडेकर)**

दिनांक–20/02/2026

न्यायाधीश,
कामगार न्यायालय क्र. 1 औरंगाबाद